

# शिवारातल्या गोष्टी

दत्तात्रय भापकर

# शिवारातल्या गोष्टी

दत्तात्रय भापकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# शिवारातल्या गोष्टी

## (Shivaratalya Goshti)

कथा

लेखक : दत्तात्रय भापकर

आदित्य हेरिटेज , ए विंग,  Flat no 501,

व्ही एन पुरव लेन, चुनाभट्टी, मुंबई- 400022.

Email :- dattatrya.bhapkar@gmail.com

Ph : 9172131536

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Teen Hath Naka, Thane

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ मार्च २०१५

©esahity Pratishthan® 2015

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या कथांतील

सर्व पात्रे,

प्रसंग आणि स्थळे

पूर्णतः काल्पनिक आहेत.

वाचकांशी हितगुज ......

वाचक मंडळानो, बुद्धीदात्री सरस्वती मातेला, भैरवनाथाला  नमन करून शिवारातल्या गोष्टी हे माझे पुस्तक

आपल्या हाती देण्यात मला आनंद होत आहे.

आज पर्यंत या बाबींवर महाराष्ट्रातून भरपूर लिखाण झाले आहे.

परंतु माझ्या मनातल्या काही वैचारिक भावना

आपल्या समोर मांडाव्यात अशी फार इच्छा होती.

ती आज पूर्ण होत आहे,

तरी आपणास या गोष्टी निश्चितच समाधान देतील यात शंकाच नाही.

आपला

श्री. दत्तात्रय नाथा भापकर

एम. ए. बी.एड.

ऋणनिर्देश

माझे आईवडील,

माझ्या गावातील ग्रामस्थ मंडळी,

श्री. पेडणेकर सर, श्री पोळसर, केणीसर

तसेच अकॅडमीचे विद्यार्थी

यांच्या अविरत प्रयत्नांमुळे हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

तरी मी याचे ऋण मानतो.

धन्यवाद .

दत्तात्रय नाथा भापकर

# शिवारातल्या गोष्टी

# शिवारातल्या गोष्टी

१  कुस्ती
२ तंबाखु
३ लेझीम
४ केसाची बट
५ मेजवानी
६ झोका



# कुस्ती

बबन फलटणमध्ये सायकलच्या दुकानात कामावर होता. दिवसभर काम करणं व संध्याकाळी सातच्या सुमारास गावाकडे सायकलवर गावी येणे हा दररोजचा नित्यक्रम, हा घोडे गावाचा; अंगानं-पिडान भरलेला उंचपुरा गबरू जवान. गावातील सर्व लोकांत उजवा. शक्तीचा उपयोग तो कुस्तीसाठी करीत होता. तो गावाची शान होता. परंतु स्वतःच्या ताकतीचा त्याला फार गर्व! गावातून निघताना जणू तो गावातल्या लोकांना कुस्तीसाठी ललकारीत आहे असेच वाटत असे. त्यामुळे जो तो वाकून त्याला सलाम मारीत असे.

गावात दरवर्षी असणाऱ्या म्हसोबाच्या जत्रेत अनेक गावाचे पहीलवान येत पण पठ्ठ्याच विजयी ठरत असे. पण या कुस्त्या चालणार किती दिवस? वय वाढत चाललं होतं. घराची गरीब परिस्थिती अशा स्थितीत घर चालवण्यासाठी कुठेतरी काम राहावं म्हणून फलटण मधील सायकच्या दुकानात कामाला राहीला. पण शहरात कामाला राहील्यापासून अनेक मित्रांशी दोस्ती झाली खरी, पण आज पर्यंत सुपारीही न खाणारा बबन हळूहळू नव्या मित्रांमुळे दारू सुद्धा पिऊ लागला. अशा स्थितीतच तो दररोज सायकल वर घरी येत असे. हे दररोज चाललेलं होतं.

एक दिवशी दिवसभर भरपूर काम केलं. भरपूर गिऱ्हायिकं मिळाल्याने कामाचा ताण फार झाला होता. आता बबननं ठरवलं हीराकाकुच्या गुत्त्यावरनं दोन रुपयांची नौटाक हाणल्याशिवाय काही शिन जायचा नाही असा विचार करून तो काकुच्या गुत्त्यावर गेला. अनेक प्रकारची गिऱ्हायिकं तिथे जमा झाली होती. बबन प्रत्तेकाकडं नजर टाकून त्यांना न्याहाळत होता. एक नौटाक मागवून तो पिण्यात दंग झाला. त्यातल्या एकाचं लक्ष बबन कडे गेलं. तो आपल्या मित्रांना सांगू लागला.

" तो बघा घोडेगावच्या पैलवान कसा झोकात हाय. मी त्याच्या लई कुस्त्या बघितल्यात, लई झ्याक ताकत हाय गड्याची. "

या बोलण्याने बबनच्या शरीरावर पावशेर मास आणखी चढलं. त्याला हवेत उडत असल्या सारखा वाटू लागल. आज दोन रुपये ऐवजी दहा रुपयांची तो दारू प्याला. आता घराकडं गेलं पाहीजे असं त्याला वाटू लागलं. सायकलवर टांग टाकून दारूच्या नशेतच तो गावाकडं निघाला.

उन्हाळयाचे दिवस होते. कडूसं पडलेलं होतं. सर्व मंडळी घरी जाऊन कामाचा शिन घालवण्याचा प्रयत्न करीत होती, पांदीच्या वाटंनं बबन घराकडे निघाला होता. आज वातावरणात थोडा गारवा जाणवत होता. गडी दारूच्या झोकात. सायकल हाकीत चालला होता. आता तो मांजरीच्या वड्यात आला. हा वडा म्हणजे भुताखेतांचा राजवाडाच! असं म्हणतात. कारण इथे दर अमावास्येला वेगवेगळे अनुभव घ्यायला मिळतात म्हणे! पण दारुड्याला त्याचं काय? तो त्याच्या रंगात, गाणं म्हणत चालला होता. " पैलवान आला गं, पैलवान आला. "

पण त्यानं अचानक सायकल थांबवली. काय दिसलं त्याला कुणास ठावूक! तो सायकल वरून उतरून सायकलला स्टॅंडवर उभा करून तो एका

हिरव्यागार झाडाकडं चालू लागला, अरं बापरे! हे काय कोणी तरी झाडाला उघडं लटकत होतं. हवेमुळे ते हलत होतं. कापऱ्या नजरेनं बबन त्याला न्याहाळत होता. उघडं बंब धूड झाडावर लटकत होतं. हे बघून बबनच्या दारूनं उसळी मारली. त्याच्या पैलवनकिचं शरीर त्याला गप्प बसू देईना. "बंबाटण्या झाडाला काय लटकतुयास. आरं उतर कि खाली! मला बघून झाडावर लपून बसतुयास व्ह्यय रं. आरं दम असल तर उतर खाली. आज खेळ कि, कुस्ती माझ्यासंग."

आता झाडावरच धूडही हलू लागलं होतं. बबन पुन्हा त्याला म्हणू लागला, आरं असं शेवग्याच्या शेंगेवाणी काय हालतुयास. काय हीजडा हायस व्हा रं! असं म्हटल्यावर मात्र काय झालं कुणास ठाऊक बबनच्या कमरेत लाथ बसली. तो उलटा-पालता झाला. तसाच भेलकांडत उठला व शिवी हासडून कुस्तीला उभा राहीला आता. दोघाही हिंद केसरी व कर्नाटक केसरी असल्यासारखं लढू लागले. रात्रीचा अंधारात नुसता आय-आय एवढाच आवाज येत होता. कुणी तरी कुणाला धोबी घाट घालत होता. दुसरा वाचवा म्हणत होता शेवटी -शेवटी, आवाज क्षीण होत गेला व वातावरणात काही तास चाललेली कुस्ती संपल्याची जाणीव झाली. सगळीकडे शांतता पसरली होती.

सकाळ झाली. इकडं आपला नवरा घरी न आल्यानं कासावीस झालेली रखमा गावातल्या लोकांसह शोधा-शोध करीत तिथं पोचली होती. काट्याच्या फांजरीत बबन रक्त बंबाळ अवस्थेत पडला होता. सारं अंग खूप सोलाटलं होतं. सारखं आय, आय करीत होता. गणप्या व रव्या पुढं झालं आणि त्यांनी काट्यातनं त्याला बाहेर काढलं. रखमेनं पदरानं हवा घातली. गडी कसा तरी शुद्धीवर आला पाटील पुढे सरसावून बबनला विचारू लागले.

"काय रं बब्या! आरं लेका तुझी बायकू आण पोरं रातभर वरडून थकली. सारा गाव रातभर जागा हाय, तू हीतं दारू पिऊन पडला हायस व्हय. तुला जोड्यानं हानला पाह्यजे! " बबन गप्पच होता.

पाटील पुन्हा म्हणाले, "आरं, पण रातभर तु इथं काय केलस, आन ह्या जखमा कशा काय झाल्यार तुला ?"

बबनला पुन्हा स्फूर्ती आली.

तो म्हणाला "रातभर कुस्ती खेळत हुतो"!

"कुस्ती आन ती कुणा बरं?" हे सगळेच म्हणू लागले.

इतक्यात इज्याची नजर बाजूच्या झाडाकडं गेली. इज्या मधेच म्हणाला, " आरं हे काय येगलंच झालं. " आरं ह्यांनं तर आत्महत्या केलीय कि, " ह्यो काय गळयाला फास अडकवलाय. "

तेव्हा कुठे साऱ्यांचं लक्ष झाडावरच्या पक्याकडे गेलं. दोघे चौघे धावले. पक्याचे मृत शरीर खाली घेतले गेले. ते गावात आणले गेले. त्यान आत्महत्या का केली? ह्या प्रश्नच उत्तर पोलिस शोधू लागलं. उत्तरही मिळाले. नवरा बायकोच भांडण. सारा गाव हळहळत होता.

पण इकडं बबनच्या अंगाला दरदरून घाम फुटला होता. बोबडीच वळली होती. आपण रातच्याला माणसासंगं नव्हं तर, पक्याच्या भूतासंगं कुस्ती खेळलो! या विचारानच त्याला तापच चढला. ही बातमी गावात पसरली.

सगळयांच्या मनात भीतीची लहर उठली. मांजरीच्या वड्यात आणखी एक भूत जमा झालं होतं.

अनेक दिवस निघून गेले आता बबन चांगला झाला होता. एकदा मांजरीच्या वड्यात उभ्या असलेल्या बबनच्या मनात पुन्हा एकदा विचार आला कि,

" आरं च्या आयला, ह्या भूतानं मलाच का हाणलं.

तोच वड्यातन आवाज आला.

"आरं बब्या लेका मला वाटलं तु माझी बायकोच हायस! "

# तंबाखू

सुगीचे दिवस होतं. पावसानं यावर्षी चांगली साथ दिली होती. त्यामुळं दहा वर्षात आलं नसंल एवढं पिक यावर्षी आलं होतं. गावात सगळीकडे आनंदी पसरला होता. सगळी माणसं वरूण राजाला धन्यवाद देत होती. सात वाजता घराच्या बाहेर पडणारी माणसं पहाटेच्या पाच वाजताच घराचं कवाड बंद करून आपआपल्या शेतात जात होती. दिवसभर शेतात राबून बायका-पोरांसह कष्ट केल्यानं मळेवाडीचं शिवार अगदी स्वर्गासारख दिसत होतं. शिवारात हिरव्यागार पिकांमुळे वातावरणात गारवा जाणवत होता. डोंगराच्या मध्यभागी वसलेलं गाव अगदी हिरवा शालू नेसलेल्या नव्या नवरीसारखं दिसत होतं.

कुणाच्या शेतात बाजरी, कुणाच्या शेतात ज्वारी, कुणी भिमुंग केला होता. तर कुणी साळीच पीक घेतलं होतं. सर्वजण जिवापलीकडे शेताची जपणूक करत होते. दिवसभर शेतात राबणारा शेतकरी रात्रीही कोल्ह्यापासून पिकाचं रक्षण करण्यासाठी शेतात खोपीत बसत होता. शिरपा याच गावातला भोळा-भाबडा गडी. पण चतुर व हुशार. वेळ प्रसंगी कुणाशीही दोन हात करण्याची तयारी असलेला तसा प्रसंग आजवर गावात आला नव्हता. कारण तो कोणाच्या वाळल्या-पाचोळयावर ही कधीच पायही देत नसे. सकाळी उठायचं, नदीवर जाऊन अंघोळ करायची, वल्या पडदीन देवाची पूजा करायची आणि बैलगाडी घेऊन शेतात जाऊन कष्ट करणं एवढाच

त्याला जणू माहीत होतं. गावात त्याला फार मान होता. त्यामुळे सर्वांशी तो कोड कौतुकाने वागत असे. त्याला दोन मुले व बायको असा परिवार होता. रहायला साधं पण वडिलोपार्जित घर होतं. सगळं कसं व्यवस्थित चाललं होतं.

यावर्षी तर शेतात चांगलं पिक आलं होतं. शिरपाला हवा तेवढा आनंद झाला होता. तो पुन्हा तरणा होऊन जवान पोरां पेक्षा जास्त कष्ट करीत होता. शेतात भिमुंग, बाजरी लावलं होती. पिक कसं झ्याक आलं होतं. हिरवगार शिवार बघून त्याला सुखावल्या सारख वाटत होत. दिवसभर शेतात कष्ट करीत होता आणि रातच्याला पिकांच्या रक्षणा साठी खोपीत जागून रात काढीत होतं. पोरांनी, बायकोने खूप विनवण्या केल्या.

"पोरं राहतील रातच्याला राखणीला, तुम्ही घरीच झोपा. " बायको म्हणाली; तेव्हा शिरपा म्हणत असे, " आरं राखण करणं कुणाचबी काम नाही, कवा-कवा लांडग, कोल्हेबी येतात. त्यांच्याशी दोन हात कराव लागत्यात, ह्या पोरास्नी जमायचं नाही तुम्ही अजून बारीक हाय!

असं ऐकल्यावर पोरांचा व बायकोचाही काहीच इलाज चालत नसे. पोरांचे त्यामुळे आपल्या बापावर फार प्रेम होतं. कारण कोणतच संकट त्याला त्यांच्यावर येऊ द्यायचं नव्हतं.

एके दिवशी संध्याकाळची वेळ होती. कडूसं पडलं होतं. रातकिडे किर-किर करत होते. सगळे शेतकरी पोटाची खळगी भरायला घराकडं आले होते. पाखरं घरट्यात विसावा घेत होती. पण मधून मधून कुत्र्याचं भूकण, तान्ह्या पोरांचं वरडण तसेच भाकरी थापताना होणारा आवाज कानावर पडत होता. इकडं शिरपाची बायको

लक्ष्मी भाकरी थापत होती. शिरपानं हात-पाय धुतलं. घरात आला देवाला नमस्कार करून बायकोला म्हणाला, "  अगं, झालं का नाय जेवाण, अगं राखणीला जायचं हाय मला सगळं शेतकरी गेलं असत्याल  राखणीला. मीच मग राहून कसं चालल?"

तेवढ्यात “शिरपा, चल कि राखणीला. " अशी हाळी आली.

आता मात्र शिरपाला राव्हना, बाहेर येउन तात्याला म्हणाला, " आरं तात्या तू हो पुढं, मी दोन घास खाऊन येतो मागनं" इकडं बायकोनं ताट वाढलं होतं. शिरपाना दोन भाकरीचा न कालवणाचा काला केला व ताटाला कळायच्या आतच जेवण पोटात ढकललं. पाणी पिऊन उठला व पोरांना म्हणाला, "पोरांनो, आज अमुशा हाय चोरा-चिलटाच भ्या हाय, तरी जाग-सुदच झोपा बरं का!” असं म्हणून शेतावर निघाला.

आज वातावरणात थंडी जास्तच जाणवत होती. शिरपाच्या उघड्या शरीराला ती चांगलीच बोचत होती. तो शेतावर आल्यावर सगळ्या पिकातनं फिरला. सगळं बेस आहे असं वाटल्यावर खोपीत आला. काड्यांच डबड, रॉकेल घेऊन बाहेर आला व साळीच्या पेंड्या व थोडीशी लाकडं घेऊन शेकोटी पेटवून अंगाला शेकत बसला.

बसल्या बसल्या विठ्ठलाच्या भक्तीचे अभंग म्हणत होतं. वारा जोरात वहात होता. पिकांमुळे सुंदर सुगंध रानात पसरला होतं. घुबडाच्या आवाजाचा प्रतिध्वनी अलगद कानावर येत होता. रात अर्धी उलटली होती. शिरपाच्या शेतातून गावात जाण्यासाठी एक पाऊल वाट जात होती. तसेच शेताच्या बाजूला एक गाडी रस्ता होता. तो दुसऱ्या गावांना जात होता. शिरपा अंग शेकण्यात व अभंग म्हणण्यात

दंग होता तेवढ्यात त्याची नजर त्या गाडी रस्त्यावर गेली. कुनीतरी त्याच्या शेताच्या दिशेने चालत येत होता, रातच्या वेळी कोण असावा. पण दाट अंधारामुळं काही दिसत नव्हतं. ती व्यक्ती चालत -चालत जवळ आली व रामराम करत याच्याशी बोलू लागली. "राम राम पाव्हणं. "

" राम राम आपण कुणाच्या गावचं?" शिरपाने दणकट आवाजातच विचारले.

" मी त्या इलासपुरचा. " ती व्यक्ती म्हणाली.

"पण इकडं कुणाकड या वक्ताला चाललाय ?" शिरापाने विचारले.

"रामुस आळीला चाललो व्हतो, गाडी चुकली म्हणूनच चालतच आलो. " व्यक्ती म्हणाली.

"रामुस आळी तर लय लांब हाय. असं करा जर येळ बस इतच पहाटेचं जा पुढं. "

"बर तसंच करतू. पण पाव्हणं गार लय पडलया जर तमाखू द्या कि! " ती व्यक्ती बुड टेकून बसत म्हणाली.

अंधारात त्या व्यक्तीचा चेहरा ओळखू येत नव्हता. फक्त एकमेकांचं बोलणं ऐकू येत होता. शिरपा तंबाखू द्यायला चंचीत हात घालून तंबाखू चाचपडू लागला. अचानक त्याची नजर शेकोटीच्या उजेडामुळे दिसणाऱ्या त्या व्यक्तीच्या पायाकडे गेली. तो थोडा चरकलाच. "आरं हे काय वेगळचं! " मनाशीच घाबरून

म्हणाला, " ह्याच तर पाय उलटं हाईत, उलट्या पायाचा हो माणूस कसा काय?" तो बावरून गेला होता. अशा स्थितीत त्याने शेकोटीतले लाकूड घेतले व त्याचा चेहरा पाहण्याचा प्रयत्न केला तर काय! त्याचे डोळे वर होते. तोंडातून रक्त वाहत होतं, अंगावर एकही कपडा नव्हता, " आरं ह्यो तर माणूस नाय! ह्या तर येताळ हाय! " ह्या अगोदर भूताविषयी अनेक गोष्टी ऐकल्या होत्या मात्र आज भूताच दर्शनच होत होतं. त्याची बोबडीच वळली होती. अंग तापल्यासारखं वाटत होतं, वातावरणात थंडावा होतं तरी अंगाला घाम सुटला होता. मन पूर्णपणे भीतीच्या अधीन होतं. अशा स्थितीतही त्याने स्वतःला सावरले, त्याने विचार केला, "असं पळून जाण्याचा प्रयत्न केला तर प्राणास मुकावे लागेल, त्याच्यापेक्षा काही तरी युगात करायला पाह्यजे. ' भूत आगीला घाबरतात. ' असं त्याने ऐकले होतं. आपण त्या आगीचाच वापर या भुताला पळवून लावण्यासाठी केला तर?" असा विचार त्याच्या मनात आला व या विचाराने तो थोडा धीरावला. त्याने हळूच शेकोटीतले पेटलेले लाकूड घेतले व पोटाला जोरदार चटका दिला आगीच्या चटक्याने ते भूत चिक-चिक करत वेगाने पळून गेले व अंधारात गडप झाले इकडे शिरपाने सुटकेचा निःश्वास सोडला.

तांबडे फुटले, सकाळ झाली तो अंघोळ करून गावात आला. पण ही बातमी त्याने गावात सांगितली नाही. इकडे तात्या आजारी असल्याचे त्याला समजले. तेव्हा त्याला पाहण्यासाठी तो त्याच्या घरात गेला. अरे बापरे! किती हे लोक! " काय झालं तात्याला ?" शिरापाने राम्याला प्रश्न विचारला राम्या म्हणाला, " आरं तात्यानं कुणालातरी त्याच्या रानातन पळताना बघितलं ब्याटरीच्या उजेडात तात्यानं त्याचं त्वांड बघितलं त्या वक्ता त्यो बेसुद्ध पडलाय. "

" आरं पण त्यो होता तरी कोण?" शिरापान विचारलं.

"भूत नं कोण ?" राम्या म्हणाला.

"तुला कसं माहीत! " पुन्हा शिरपानं विचारलं.

" आरं मधी तात्या सुदीवर आला होता. तवाच त्यो म्हनला. " रामा म्हणाला.

हे ऐकल्यावर सगळेच घाबरले. सगळेच तात्याला दिलासा देऊ लागले. सगळेच म्हणत होते. " आरं तात्यासारखं जिगरबाज माणूस गावात न्ह्याय, येताळाला बघून सुद्धा जीवंत हाय! " सार गाव भीतीने असं म्हणत होतं. तेव्हा शिरपा मनात होते, " आरं लोकांनो, मीच त्याला चटका दिला होता. म्हणून तात्या वाचला, नाय तर तात्याचं आज काय खरं न्हवतं. तरी तात्याचंच कवतुक करतया. या जगाची रीतच वेगळ हाय. आता पुन्हा जर माझ्याकड भूत तंबाखू मागायला आलं तर सरळ तात्याकड जा असं सांगिन, मग बस बोंबलत तात्या लेक म्हणावं!”

# लेझीम

पांडू तात्या गावातील प्रतिष्ठित व्यक्ती! कुणालाही काही अडचण आली कि, पांडूतात्या त्याला मदत करीत असे. घर मुला बाळांनी भरलेलं, नातवंडे अंगा खांद्यावर खेळत होती. तात्याचा वेळ कुटुंबात व समाज वेळेत कधी जात असे कळत नसे. तात्याचे सध्याचे वय पंच्याहत्तरच्या आसपास असल; पण चटणी भाकर, कळणा-कोंडा खावून पण शरीर राखलेलं, त्यामुळे त्याचं उतार वय जाणवत नव्हतं.

गावात वेगवेगळया तऱ्हेची माणसं होती, प्रत्येकाची परिस्थिती ही वेगवेगळी, तरीही गावातील एकी कायम होती. याचं उदाहरण म्हणजे गावची जत्रा. भैरवनाथ देवाची जत्रा दरवर्षी भरत असे. गावातल्या लहान पोरांपासून काठीवरच्या म्हाताऱ्यापर्यंत उत्साहाचं वातावरण! तात्या गावचा पाटील असल्यानं जत्रेच्या प्रत्येक कामात त्याचं सल्ला घेतला जात असे. गावातले लोकही तो पाळत असत. या जत्रेचे वैशिष्ट्य म्हणजे, ' लेझीम स्पर्धा ' उत्कृष्ठ  लेझीम खेळणाऱ्या गावाला जत्रेत चांदीची ढाल देऊन सन्मानित केले जात असे. त्यामुळे गावागावातील मंडळी आपापल्या संघासह हजर राहून लेझीमचा खेळ दाखवत असत.

यावर्षी ही जत्रा उत्साहातने पार पाडली. चांदीची ढाल वाघवाडीने पटकावली. सर्वांना आनंद वाटला. जत्रेचे वातावरण हळू हळू काळाच्या गर्भात विरत

चालले होते. पण लेझीमचे वारे वाहायचे थांबत नव्हते. घोडेगावात तात्याच्या नेतृत्वाखाली लेझीमचा सराव तरुण पिढीला दिला जात असे. तात्या अजून सुद्धा लेझीम खेळण्यात पटाईत होते. पोरांना त्यांचा अनुभव कामी येत असे. यातच वाघवाडीच्या पाटलाच्या मुलाचे लग्न होते व घोडेगावच्या नवीन लेझीम मंडळाला तात्यासह आमंत्रण आलं होतं. सर्वांमध्ये नवीन उत्साह निर्माण झाला. कारण लेझीम खेळण्यात पटाईत असणाऱ्या गावासमोर आपल्याला लेझीम खेळण्याची संधी मिळणार होती. तात्यालाही चेव चढला होता. तो त्यांना म्हणत असे, " पोरांनू, गाव लई बेरकं हाय, लेझीम खेळण्यातलं तिडं त्यांना माहीत हायत. तेव्हा जरा यवस्थित खेळा. आज गावाचं नाव राखायचं हाय, तव सगळयांनी कसून सराव करायला पाहीजे. " गावातल तरुण मंडळी त्यांना होकार देत आश्वासन देत होती.

लग्नाचा दिवस उजाडला. लग्न लागली. लेझीम संध्याकाळी बत्तीच्या उजेडात खेळायचं होतं. तरुण मंडळी आपापले लेझीम घेऊन तात्याच्या घरी आली. शिव पुढे झाला म्हणाला, " तात्या, हायेत का घरात ?"

"कोण हाय ?" आतनं आवाज आला.

" आम्ही लेझीम खेळणारी मंडळी हाय! " भावड्या म्हणाला.

तेवढ्यात तात्या बाहेर आलं. सगळया पोरांनी त्यांना नमस्कार केला. तात्या त्याला म्हणाले, " आरं पोरानो, आमची गाय झालीय व्यायला तव तिचं काम झालं कि, रातच्या दहा-अकरापर्यंत येतुच कि मी मागनं. खेळ काय रातभर चालंल. तुम्ही व्हा म्होरं. "

बर म्हणत पोरांनी वाघवाडीचा रस्ता धरला. इकडं तात्याच्या गायीला शेवटच्या बाळंत कळा येत होत्या. तात्या चिंतातूर होता! सारखे म्हणत होते, "देवा,

कर मोकळ बाबा माझ्या बबडीला. " देवानं त्यांचं गाऱ्हाणं ऐकलं. गाय व्यायली. छानसा खोंड झाला. तात्या मोठ्या मोठ्याने ओरडत घरात गेले. बायको- पोरे. नोकर यांना आनंद झाला. आता तात्या घरातल्यांना म्हणाले, " भैरवनाथाच्या किरपेने सगळं झ्याक झालं. गायची आन बाळाची काळजी घ्या रातभर मी जरा वाघवाडीला जाऊन येतो. तेवढ्यात बायको म्हणाली, " आवं रातच्या आकरा वाजल्यात. आन त्यात आज अमुशा हाय. तवा राव्हद्या जायचं.

" खुळी हायस अग तिकडं लेझीम सुरु झाला असल. पोरं वाट बघत असतील, अमुशा काय मला खातीय व्हय. " असं तात्या म्हणत सोप्यातला कंदील घेऊन पांदीच्या वाटनं वाघवाडीला जायला निघाले.

रात्र अमावस्येची होती. थंडी वाढली होती. अंधार मी म्हणत होता! डोळयावर बोट घातलं तरी दिसत नव्हतं. सारं गाव झोपलं होतं. इकडे तात्या कंदिलाच्या उजेडात रस्ता तुडवत चालले होते. वाघवाडी आता हाकेच्या अंतरावर झाली होती. फक्त मांजरीचा वडा पार करायचा होता. तात्या पाण्यात उतरावं तसं सावकाश वडा उतरत होते. झाडांच्या मधनं वाट होती. त्यात अंधार! काळजात भीती आपोआप निर्माण होत होती. पण तात्या निडर होते. वड्यात मध्यभागी आल्यावर तात्याला मागन " तात्या मागं बघ. " असं आवाज आला. तात्याला तो भास वाटला. पुन्हा तसाच आवाज आला. तात्यांना थोडीशी शंका आली. " इथ मला बोलावणारा कोण असंल?" तो तसाच पुढं चालला होता. पायाखालचा रस्ता पण आज कितीही चाललं तर रस्ता उरकत नव्हता. पुन्हा तोच आवाज करीत कोणीतरी अचानक अंगावर आलं. तात्यांना एकदम झटकाच बसला व मागे वळून पहीले तर काय? काळा बोका! कधी तो बारीक होत होता, तर केव्हा तो हत्ती एवढा मोठा होत होता. कुणालाही न घाबरणाऱ्या तात्यांची पाचावर धारण बसली. आता मांजराचं रुपांतर

काळ्या बुरख्याच्या भूतात झालं होतं. ते वेगवेगळ आवाज करीत तात्याच्या अंगावर येण्याचा प्रयत्न करीत होते. तात्यांनी चाचपडत विचारलं, "काय पाहीजे तुला ?"

एक कोंबडा दे मला, लई भूक लागलीय! "

"कोंबडा, कोंबडा आन ह्या वक्ताला! " तात्या म्हणाले.

भूत ऐकायला तयार नव्हते, ते अचानक मानगुटीवर बसले. त्या झटक्याने ते बेशुद्ध पडला.

तात्या रात्रभर तिथच पडून होते. सकाळी वाघवाडीहून परतणाऱ्या पोरांना तात्या दिसले. त्यांनी त्यांना उचलून घरी आणले. तात्या आता शुद्धीवर येऊ लागले होते. पण अंगात ताप चढला होता. घामानं अंग अजून वलं होत होतं. वाचा साथ देत नव्हती. त्याच्यातन पण तात्या, " मला कोंबडा दे, न्हाय तर मारून टाकीन, तुला. " म्हणत होते. हळू हळू सारा गाव तात्याच्या वाड्यात जमा झाला होता. तात्याचं बोलणं ऐकून श्यामा म्हणाला, "पाटलीन बाय, हे काय येगलच हाय. अवं तात्यास्नी भूतानी झपाटलंय त्या वाड्यातल्या. आव दादा मांत्रिकाला बोलवा. तो सगळं ठिक करील. "

श्यामचं बोलणं ऐकून गावातल्या लोकांच्या भितीनं नाड्याच थंड पडल्या होत्या. सगळे आपापले भूत अनुभव सांगू लागले. सारं वातावरण भूतमय झालं होतं. तेवढ्यात दादा मांत्रिक तेथे आला, तात्यांना बघितलं आणि म्हणाला, " शाम्याचं बोलणंच खर हाय. वड्यातल्या भूतानं त्यास्नी झपाटलं हाय. तरी माझ्याच्यानं जे हुइल ते करीन, भूत लई येगळं हाय, अमुशाला कुणी तरी त्याचा बळी पडतच. तात्या ह्या येळी गावला त्याला. " पुढे दादा मांत्रिक म्हणाला, " तात्यांना झपाटलेल भूत कोंबडा मागतया तवा. त्याला आजच्या रातीला बाराच्या सुमारास कोंबडा दिला पाहीज्ये.

न्हाय तर तात्यांच्या जीवाला धोका हाय. तवा पाटलीन बाय तुमच्या थोरल्या पोराला, रामाला ह्या काम करायला लावा. तवर हीकडं मी बघून घेतो.

रात्र वाढली होती. रात्रीच्या अकरा वाजता रामा कोंबडा घेऊन मांजरीच्या वड्याकडे निघाला. सारा गाव चिडीचूप होता. तात्याचा वाडा भरलेला असूनही भितीनं तोंडातनं अक्षर निघत नव्हतं. लहान पोरं आईच्या पदरात मुंडकं खुपसून नुसतच बसली होती. आता तो वड्यात आला होता आणि त्याने कोंबडा वड्यात सोडला, मागं न बघता. तो परत माघारी घराकडे येऊ लागला. इकडं तात्याची तब्बेत चांगली झाली होती.

पण घात झाला! थोड्या वेळाने पुन्हा त्याची तब्बेत बिघडली. तात्याच्या तोंडातनं शब्द बाहेर पडले “रामा हे काय केलस, सगळंच वाकडं केलंस! " सगळं गाव वाड्यात बसून होतं. सगळे दादाच्या शब्दांना कान पसरून ऐकत होते. रामा घरी आला व म्हणाला,

" तात्याची तब्बेत कशी काय?"

“आरं बाबा, ह्ये काय केलंस.”

“मी काय केलं?”

“त्या भुताला कोंबडा मिळाला न्हाय वाटत. कोंबडा हीतच हाय." दादा मांत्रिक म्हणाला

“काय! कोंबडा मी माझ्या हातानं वड्यात सोडलाय. " रामा म्हणाला.

" आरं येड्या मी त्या कोंबड्याच मानगूट मुरगळून मारून वड्यात टाकायला सांगितलं व्हतं. तू त्याला मोकळा सोडलास. घराच्या भाइर त्यो उभा हाय बघ."

रामा पळतच गेला. बघतो तर काय! खरंच कोंबडा घराबाहेर उभा. रामानं तसाच कोंबडा पकडला. आन वड्यात मानगूट मुरगळून फेकून वाड्यात परत आला.

आता मात्र तात्या भुताच्या छायेतनं माणसात परत आल्यासारखं बोलू लागले होते. साऱ्या गावाला आनंद झाला. सगळे दादा मांत्रिकाच वाहवा करू लागले होते. पण तरीही मांजरीच्या वड्यातल्या भुताची भीती लोकांच्या मनात घर करूनच होती. तात्या आता बरे झाले होते. गावातलं वातावरण निवळले होते.

परंतु त्याचवेळी इकडं मांजरीच्या वड्यातन आवाज आला.

" तात्या, पुन्हा कवा येणार हाईस? वाट बघातुया मी. "

# केसाची बट

संध्याकाळची वेळ होती. ढगाळ वातावरणात उष्मा जाणवत होता. शेतात काम करणारं शेतकरी घरी परतणाऱ्या पक्ष्यासारखं घराकडं माघारी फिरले होते. संतू लव्हार दिवसभर काम करून थकला होता. त्याला पण घराची ओढ लागली होती. नांगर सोडला, पाटात हात पाय धुवून गाडीला बैल जुंपलं. घराकड निघाला गाडीचा खुळ खुळ आवाज आणि वाऱ्याचा सळसळ आवाज एकच वाटत होता. आजूबाजूला असलेल्या शेतातलं पिक बघून संतुच्या मनात विचार येत होता. माझं बी असं हिरवंगार रान असंल. भरपूर पिक आल्यावर लई पैका मिळल. मग मी शिरमंत होणार." गाडी खड्ड्यातन गेली, माठातले पाणी हिंदकळाव तसं संतू हिंदकळला आणि भानावर आला. आता कडूसं पडलं होतं. पण आज रोजच्या प्रमाणे बैलांना काय रान उरकत नव्हतं. बैलगाडी मांजरीच्या वड्यात उतरली होती. संतू थोडा चरकला. कारण वड्याचा इतिहासच तसा होता. पण तो भेणाऱ्यापैकी नव्हता. अंधार खूप वाढला होता. तोंड ओळख मोडली होती. बैलगाडी वड्यातन चालली होती.

तेवढ्यात अचानक कुणीतरी हात करीत असल्याचं संतुला दिसलं. अंधुकसं दिसत होतं. एक बाय होती ती. संतुनं गाडीतला कंदील लावला. अंधुक प्रकाशात हिरव्या साडीची बाय गाडी थांबवायचा इशारा करत होती. गाडी बाई

जवळ थांबली. बाय म्हणाली, " आवं दादा, मी बाजूच्या गावातली हाय. तुमच्या गावात चाललीय मला गावात सोडा. लई उपकार हुतील. "

" रातची येळ हाय, आन असला भुताटकीचा वडा. आन बाईची जात. आपल्याला मदत करायला हुवी. " असं विचार त्याच्या मनात आला.

त्याने त्या बाईला गाडीत घेतली. गाडी वड्यातन वर येऊन गावाच्या रस्त्याला लागली. गाव जवळ येत चाललं होता. दोघांच बोलणं चालू होतं. गावात कुत्र्याचं भूंकनं चालूच होतं. इकडं कंदिलाचा उजेड होता, पण पदारामुळं बाईचा चेहरा नीट दिसत नव्हता. संतू तिला न्याहाळत होता. अंदाज काय येत नव्हता. पण, आरं बापरे! हे काय बाईचं पाय उलट हायत. डोळयातनं, तोंडातन रक्त वहात होतं. डोळयाच्या बाहुल्या पांढऱ्या होत्या. संतुची पाचावर धारण बसली, त्याचं बोलणंच बंद झालं. पण त्याने त्याने तोंडावर कुलूप घातलं. मधेच त्याला वाटल. गाडी सोडून पळून जावं. पण भूतच ते, लगीच पकडंल. आन मग काय माझं खर नाय! तो तसाच बसला. आता काय करावं, पिच्छा कसा सोडवावा. काहीच सुचत नव्हतं. काय पाह्यजे असंल तिला कुणास ठावं? असं म्हणत संतुनं काडोसरीची मिशी कापायची कातर काढली आणि हळूच तिचं लक्ष नाही बघून तिच्या मोकळया केसाची बट कापून घेतली. काय झालं तिलाही कळल नाही.

आता गावाची वेस आली. गाडी वेसेतनं आत आली. संतू पुढे बघून गाडी हाकत होता. त्यानं गाडी थांबवली व तो बायला म्हणाला. " हं! बाय, उतरा आता आला गाव.' मागं बघितलं तर बाय गाडीतच नव्हती. त्याच्या काळजाचं पाणी पाणी

झालं. 'आयला ही बाय गाडीतन कवा उतरली हे आता आलं माझ्या ध्यानात. गावाच्या वेसेतनं भूताना आत येता येत नाही. म्हातारी माणसं म्हणतीती ते, लई येळा आईकलयां. "

तो तसाच घरी आला. एकटाच होता तो. आई बाप लहानपणीच मेले होते. लग्न अजून झालेले नव्हते. गावानंच त्याला संभाळल होतं. एका झोपडीत राहत होता. आत आल्यावर झोपडीचं दार बंद करून तो चुलीवर जेवण बनवीत होतं. तेवढ्यात दारावर थाप पडली. " येवड्या रातच कोण आलं असल! " मनात विचार आला तसाच संतू उठला आणि दार उघडलं मगाशी गाडीत बसलेलीच बाय होती. आता तर त्याची बोबडीच वळली. अंगाचं पाणी पाणी झालं. खूप घाबरला. मनात विचार आला. आता आपलं काय खंर न्हाय. हाडळीला म्या केसाचं बट कापल्याच कळलं वाटत! तो आता तीच पाय धरून माफी मागणार येवढ्यात चमत्कार झाला. ती हडळच त्याच्या पायावर आडवी झाली. " तुम्ही माझी केसाची बट कापली हाय, मला माहीत हाय, तरी ती किरपा करून मला ती परत द्या. " हडळ म्हणाली " पण मला ती कुठं ठेवली मला ध्यानात न्हाय. " संतू म्हणाला.

"अवं केसांची बट मिळाली न्हायती. तर भुताच्या मेळयात मला पुन्हा घेणार न्हायती. माझ्यावर उपकार करा. "

संतुला आता सगळं ध्यानात आलं हडळीची नाडीच त्याच्या हातात आली होती. याचा फायदा आपण उठविलाच पाह्यजे. असं राहून राहून संतुला वाटू लागल. तीचं विनवणं चालूच होतं.

संतू शांत झाला. आता मनावरच दडपण थोडं दूर झालं होतं. थोडासा धीर आला होता. तो आता तिला म्हणाला, " ह्ये बग तुला जर केसाची बट पाह्यजे असल, तर माझ्या तीन गोष्टी काबुल करायला व्हाव्यात. "

"मला कबूल हायत्या" - बाई म्हणाली.

"पहीली गोष्ट माझी गरिबी दूर व्हायाला पाह्यजे. तवा मला लई पैका पाह्यजे. दुसरी गोष्ट म्हणजे झोपडीत ऱ्हाऊन लई कटाळा आलाय. तवा गावाच्या भाईर एक झ्याक माडी तयार कर.

आणि तिसरी गोष्ट म्हंजे माझ्याबरं तुला लगीन करायला व्हावं. मान्य हाय तर बोल न्हाय तर आली तशी माघारी फिर. "

खूप वेळ विचार करून ती बाई "होय " म्हणाली. संतुला हायसं वाटल. त्याला हवेत असल्या सारख वाटू लागल.

दुसरा दिवस उजाडला. रातभर चाललेल्या गोंधळान उशिरा झोपलेला संतू उठला. पण काय आश्चर्य! आता तो त्याच्या झोपडीत नव्हता. एका टुमदार माडीत होता. घरात पैसा धन धान्य सगळं होतं. ती बाई समोर उभी होती. आता त्यानं ठरवलं होतं. उद्याच या बाई बरोबर लगीन करायचं! इकडं गावात चर्चा सुरु होती. कुणी कुणी म्हणत होते, " आवं ह्ये तर काय येगळच घडतया गावात. एका रातीत माडी अन एवढा पैसा काय तरी भानामत हाय! "गावाचं वातावरण पिकलं होतं. वरवरचं बोलणं संतुच्या कानावर आलं. तो तसाच गावात आला. गावात कुजबुज चालू होती. तो तडक लोकांच्या घोळक्यात जाऊन उभा राहून लोकांना म्हणाला, " बरं का रं गड्यानो उद्या मी लगीन करायचं ठरवलं हाय. मंडळीना सकाळीच माझ्या माडीवर

लग्नाला यायचं हाय. " मंडळीना थोडे चुकल्यासारखं वाटत होतं. संतू लव्हार हाच का? हा प्रश्नही पडत होता. " कारण एका रात्रीत माडी, पैसा, बायको कसं शक्य आहे?" पण लोकांना वाटले जाऊ द्या. आपल्याला काय करायचं हाय. लग्नाला जायचं, लाडू खायचं. सर्व लोक घरी गेले. संतुनेही गावात सर्वांना आवतान दिलं. मराठ्याच्या वाड्यापासून महारवाड्यापर्यंत सगळ्यांना आमंत्रण दिल होतं.

नवा दिवस उजाडला, लग्नाची तयारी सुरु झालं होत. माडी एका रात्रीतच सजवलेली होती. समोरच्या अंगणात सुंदर मंडप घातलेला होता. सारा गाव लग्नाला आला होता. तो लग्नाचा थाट पाहून सारा गाव चकित झाला होता. लग्न झालं. सर्वजन कौतीकही करत होते. गावाचं पुढारी लक्ष्या तात्या म्हणाला, " नशीब काढलं ह्या पोरीनं. लई झ्याक हाय सगळं, संतू सारखा नवरा मिळायला तिचं मागच्या जन्माचं पुण्याच आसल. "

काळ हळूहळू उलटला होता. दरम्यान गरिबीची जाणीव असलेला संतुने मिळालेल्या संपत्तीचा उपयोग गावाच्या कल्याणासाठी केला होता. त्यमुळे संतू आता फक्त संतू लव्हार राहीला नव्हता. तर तो आता पाटील झाला होता. संसार सुखात चालला होता, दोन मुले झाली होती. एक चार वर्षाचे व एक दोन वर्षाचे होते. गावही त्याचे ऋण मानत होतं. सारं गाव त्याला देवासारख मानत होतं. त्याला पाटील व बायकोला पाटलीन बाई म्हणत होते. चैत्र महीना उजाडला भैरवनाथाची जत्रा भरली होती. खूप माणसं जमा झाली होती. या जत्रेचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बैल गाड्यांची शर्यत. पाटलाच्या घरा समोरच्या पटांगणातच ही शर्यत घेतली जात होती. पाटील हातात निशाण घेऊन शर्यत सुरुवात करण्यास पुढे उभे होते. निशाण खाली पडले. शर्यत सुरु झाली. अरे! पण हे काय! पाटलाचं लहान मुल रांगत-रांगत

शर्यतीच्या मार्गावर आलं होतं. बैलगाड्या वाऱ्यासारख्या धावत होत्या. सगळयांच्या मनात धडकी भरली होती. बैल उधळले होते. ते थांबायला तयार नव्हते. पाटलांनी तर डोळेच झाकले. पाटलीन माडीवर होती. हे दृश्य पाहून ती घाबरली. मग सावरून, तिने आपला हात लांब केला. तो एवढा लांब झाला कि पटकन तिने पोराला उचलून घेतले होते. साऱ्या गावाने हा चमत्कार बघितला. सगळयांच्या मनात धडकीच भरली, बायका तर म्हणू लागल्या, " अगं बया, ही काय भुताटकी! ह्ये तर येगळच हाय, " सगळीकडे धावाधाव सुरु झाली. ती बाई नसून हडळीण आहे. हे कळल्याने गावात भीतीचं वातावरण पसरल होतं. तीचं रूप आता पालटलं होतं. ती खरी हडळ दिसत होती. न ती आता माडीवरनं पळून नाहीशी झाली होती. संतू तिला माडीवर शोधत होता. पण ती सापडत नव्हती. तो तडक आपल्या खोलीत गेला व एका पेटीत पाहू लागला. तर काय! केसाची बटच नव्हती. संतू समजून गेला. तिला तिची बट परत मिळाली होती. त्यामुळे माणसातून ती पुन्हा हडळ झाली होती. रात्र झाली. तो झोपी गेला. सकाळी उठून पाहतो तर, तो आता माडीत नव्हता. तर तो आता आपल्या मुलांसह झोपडीत होता. कमी होती पाटलीन बाईची.

अनेक वर्ष गेली होती! अशाच एका संध्याकाळची वेळ होती. रामू सुतार आपल्या बकऱ्यांसह वड्यातून घरी परतात होता. तेवढ्यात मागून आवाज आलां. काय रामभाऊ ; नेता काय कापून माझी केसांची बट! " रामूने मागे पहीले. त्याला मागे कोणीच दिसले नाही. पुन्हा तो पुढे चालू लागला. परत त्याला तोच आवाज पुन्हा ऐकू आला. मागे वळून पहीले, तर हिरवी साडी नेसलेली बाई होती. रामूने होकारार्थी मान डोलावली व ती त्याच्या बरोबर निघून गेली.

पुढे काय घडले! सांगण्याची गरजच नाही. कहाणी पुन्हा सुरु झाली!

# मेजवानी

नामु अण्णा गावातला सगळयात वयस्कर माणूस. गावातला एकमेव मांत्रिक. गावात कधीही काही विपरीत घडलं, भूत बाधा झाली, मुठ मारली या अशा अनेक गोष्टींवर जालीम उपाय म्हणजे नामु अण्णा. दर अमावास्येला तो स्मशानात जाऊन कोणाची तरी पूजा करत असे. सारा गाव त्याला आदर देत असे. नामु अण्णांचा परिवार तसा मोठा होता. चार मुले व तीन मुली, बायको असा होता. मोठ्या कुटुंबा मुळे व गरिबीमुळे खाण्याची आबाळ होती. पोट भर खायला मिळत नसे. कधी कधी त्याला वाटत असे, कल्पतरूचं झाड मिळावं व त्याला भरपूर खायला मागून या नशिबांत देहाचं चोचल पुरवावं. पण त्यांच्या मांत्रिकतेत एवढी शक्ती नव्हती. गावात जेव्हा जेव्हा त्याच्या मंत्रीकतेचा उपयोग होत असे, तेव्हा कोंबडे बोकड कापले जाई. भरपूर मटण मिळत असे, पण या वर्षी बरेच दिवस कोणीच आजारी नसल्याने मटन आता कल्पनेतच राहीलं होतं. मनात फार वाटत असे काही तरी गावात कुणी तरी आजारी पडावं व मला मटन खायला मिळावं.

आज अमावस्या होती. घरात दिवे लावलेले होते. सगळी भावंडं ओळीने जेवायला बसली होती. नामु अण्णा तेवढा जेवत नव्हता. रात्रीचे बारा वाजता

स्मशानात पूजा करून माघारी आल्यानंतर जेवत असे. हा त्याचा नियमच असे. आज पुन्हा नेमाच्या पूजेसाठी तो बाहेर पडला. सगळीकडे काळा किट्ट अंधार होता. कोल्ह्याची कुई -कुई लांबून ऐकू येत होती. गावात मंडळी अर्ध्या झोपेत होती. पूर्ण शांततेत गाव झोपला होता. मध्येच म्हातारी माणसे खाकरत होती. नामु अण्णा पायवाटेने स्मशानाकडे चालला होता. दररोजची पायवाट पण आज त्याला ती वेगळीच भासत होती. हिरवीगार शेतातनं वारा वाहील्याने सळसळ आवाज येत होता. गार वारा सुटला होता. गाव गोड झोपेत होता. कारण अमावास्येच्या रात्री कुणीच बाहेर पडत नसे. कारण अमावास्येला सगळी भुतं जागी होतात. ते साऱ्या गावाला ठावूक होतं व इतिहासही तसाच होता, अनेकांना गावाच्या शिवारातल्या भुताटकीचा अनुभव आला होता. त्यामुळे सगळयांची घरांनी दारे दिवस मावळतच बंद होत असत.

नामु अण्णा मात्र शंकराचा अवतारच असल्यासारखा वागत असे. भीती म्हणजे काय त्याला ठाऊकच नव्हते. प्रकाशात व अंधारात त्याला काहीच फरक वाटत नसे. अंधारच आता मित्र झाला होता. मध्यरात्रीचा स्मशानात बसून कसला तरी जप करीत होता. स्मशान शांतता कशाला म्हणतात याची प्रचीती येत होती. तेव्हड्यात कसला तरी आरडा ओरडा नामु अण्णाच्या कानावर आला. त्याचे डोळे उघडले गेले. तो आवाजाच्या दिशेने निघाला. मांजरीच्या वड्यात कसली तरी डाळ शिजत होती. जत्रा भरावी तसा कसला तरी गोंधळ चालला होता. कुणीतरी हातात टेंभे घेऊन नाचत होते. “ह्या वक्ताला हीतं कोण आसंल ? अमुश्येला आन ते बी ह्या भुतांच्या वड्यात!"

नामु अण्णानी सारा प्रकार ओळखला, " आयला ह्यो तर भूतांचा मेळा हाय. बराबर हाय आज अमुशा म्हणजी गप पडलीली भूत आज पुन्हा जिवंत होताती ती आन रातभर हीतं धिंगाणा करतीती. भूतांचा मेळाच हीतं जमातुया वाटतं.” तो

हळू हळू पुढ सरकत होता. तसतसा वढ्यातल्या प्रकाशात भुताचा अवतार स्पष्ट दिसत होता. सारी भुतं वस्त्रहीन अवस्थेत नाच करत होती. आता तो त्या मेळयाच्या फारच जवळ आला होता. एका मोठ्या काळया दगडाच्या आड लपून बसून सारा प्रकार न्याहाळत होता. सारा मेळा नाचून नाचून थकला होता. आता रांगेने सर्व भुतं जेवायला बसली होती. समोर ताटात ताज्या बोकाडाचं रक्त होतं. लग्नाची पंगत बसावी तसा कार्यक्रम चालला होता. अण्णा सगळं पाहत होता. भुतं, हडळी, चेटकिणी, भरपूर मटन खात होत्या.

अण्णाला आता रहावेना झालं. मटणाचा खमंग वास त्याला खुणावू लागला होता. पण आपण त्यातलं नाही हे मन त्याला सांगत होते. काय बी झालं तरी जाईल पंगतीला बसायचं भरपूर मटन खायचं, भलं मारलं तर मारलं, पण असा डाव जन्मात पुन्हा न्हाय याचा! असा विचार करून अण्णा ने अंगावरची दंडकी काढली. धोतर काढले पूर्ण वस्त्रहीन अण्णा भुताच्या मेळाव्यात जमा झाला व जेवून येउन कपडे घालून घराच्या वाटेला लागला. भुताच्या मेळाव्यात जावूनही त्याला कोणीच ओळखलं नाही कारण कपडे काढल्याने व अंधारात जेवायला बसल्याने तो भूतांपैकीच एक जाणवत होता. भरपूर मटन खाल्ले होते. जन्मात आजच मनमोकळेपणी मटन खाल्ले होते. पूर्णत्वाचं ढेकर देवून तो घरी आला व भरपूर खाऊन कुत्र झोपावं तसा गोठ्यात वाकळेत जाऊन पडला.

सकाळ झाली. आज तो मनातून खूप खुश दिसत होता. कारण त्याला रात्रीच्या मटणाच्या जेवणाची फार आठवण येत होती. मटणाच्या कोठाराचा त्याने शोध लावला होता. आता दर अमावास्येला तो तेथे जाणार होता. या नव्या शोधाची घरात व गावात कुणालाच माहीती नव्हती. महीना संपला पुन्हा एकदा नामु अण्णाच्या दृष्टीने सुखाची रात्र आली, म्हणजेच अमावस्या होती. दिवसभर नामुअण्णाला चैन नव्हती तो रात्रीची वाट पहात होता. संध्याकाळची मेजवानी

त्याच्या डोळयापुढे येत होती. जिवाची घालमेल चालली होती. एकदाची रात्र झाली. नामु अण्णा बिन आमंत्रणाच्या मेजवानीला निघाला होता. आता स्मशानात न जाता मांजरीच्या वड्यातल्या खेळातच तो रमायला गेला. अमावस्या असूनही टेंभ्याच्या उजेडात वडा न्हावून निघाला होता. भूतांचा मेळा भरला होता. वस्त्रहीन भुते नाचत होती. अण्णा दगडा आड लपून ते रमणीय दृश्य पाहत होता.

शेवटी सगळे थकले व जेवायला बसले. झाडांमुळे वाढलेल्या अंधारात अण्णा कपडे काढून पंगतीत हळूच सामील झाला. समोरून घरून आणलेली ताटली ठेवली होती. हडळी ताटात मटन वाढीत होत्या. आरडा ओरडा करत भूत मंडळी मटणावर ताव मारीत होती. अण्णाही त्यांच्या पैकी एक जाणवत होता. या अगोदर जिवंतपणी भुताच्या मेळयात जाऊन जेवण केल्याबद्दल गावाकडून पुरस्कार दिला जावा असे कृत्य होतं हे त्याचे! ताटात भरपूर मटन वाढले जात होते. पण एक नियम होता. जेवढं वाढल जाईल तेवढं संपविलंच पाहीजे. नियमा प्रमाणे जेवढे वाढले जाईल तेवढं फस्त होत होतं. पण हा माणूस होता. पोट भरलं होतं पण ताटलीत भरपूर मटन शिल्लक राहत होतं. त्याने अगोदरच सगळी व्यवस्था केली होती. ताटलीच्या खाली भला मोठा खड्डा केला होता. ताटलीला मोठे भोक पाडले होते. त्यामुळे न खाल्ले जाईल ते मटन भोकातून खाली जात होतं.

शेवटी पंगत उठली व भूतांचा नंगा नाच, दिवट्याचे नाच पुन्हा सुरु झाले. मेळा पुढे जाऊ लागला. नामु अण्णा भूतासारखाच नाचत होता. हळू हळू नामु अण्णा मागे सरकू लागला. शेवटी सगळा मेळा पुढे गेला व अंधारात अण्णा कपडे घालून पुन्हा घरी परत आला.

बरीच वर्ष निघून गेली. आज अण्णा म्हातारा झाला आहे. अण्णा मृत्युच्या दारात आहे. मात्र तरीही ढोल-ताशाचा आवाज त्याच्या कानावर येतो आहे. मटणाचा सुगंध नाकाप्रत येत आहे. दर अमावास्येला मांजरीचा वडा त्याला खुणावत

आहे. मात्र गलितगात्र अवस्थे मुळे तो जाऊ शकत नाही. पण तात्याचे मन व आत्मा अजूनही भुताच्या मेळयात रमून जातो.

# झोका

पंचक्रोशीत या वर्षी मृग नक्षत्र जाऊनही पाऊस पडला नव्हता. त्यामुळे गावात पाण्याची टंचाई भासत होती. गावातल्या विहीरी पूर्ण आटल्या होत्या. नदीचे पाणी गुडघाभर राहिले होते. लोकांच्या डोळयात पाणी आणणारा उन्हाळा पडला होता. भैरवनाथाला नवस-सायास करून गावकरी आकाशाकडे डोळे लावुन बसले होते. शेतकरी राजा तर डोळयापुढे अंधार पडावा तसा डोक्याला हात लावून बसला होता. आता काय करावं! पावसान ह्या वर्षी दडी मारलीया. इट्टला- पांडुरंगा वाचीव देवा ! " हाच अभंग सर्वांच्या तोंडी होता. पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न होता. इतर गावांपेक्षा याचं हाल थोडं बरं होतं. पण त्या पाण्याच्या धारेसाठी दूरवर रांगाच्या रांगा लागत होत्या. पाण्यासाठी दररोज होणारी भांडणे हे तर नित्यनेमाचेच झाले होते. त्यामुळे रात्रीचे सुद्धा लोक पाण्यासाठी पंपावर येत असत.

आज रात्री सुद्धा लोक रांगा लावून होते. पंपाच्या बाजूला अनेक टेंभे लागलेले होते. त्या प्रकाशात गलबलत्या रात्रीचा शांत असणारा ओढा आज धन्यता मानत होता. ओढ्यात अनेक झाडे होती. त्यांच्या पानाच्या सावल्यांमुळे ओढ्यात

जास्तच काळोख जाणवत होता. रघु नाना रांगेत शेवटी उभा होता. सारखं हाका मारीत हुता. "आरं मला लवकर जायचं हाय. पाणी भरू द्या की." पण कोणीही त्याला पाणी भरू देत नव्हते.

रात्रीच्या बारा वाजता रघुनानाचा नंबर आला. सर्व मंडळी आपापल्या घरात जाऊन झोपण्याच्या मार्गावर होती. इकडं नाना फार थकला होता. पाणी भरण्याच्या मनः स्थितीत नव्हता. पण पाणी तर भरलेच पाहीजे. घराची मंडळी वाट पाहत होती. तो कसाबसा उठला आणि पंप हलवायला सुरुवात केली. पंप हलवताना त्याचे लक्ष हे त्या आंब्याच्या डहाळीकड लक्ष गेलं. कुणीतरी लोंबकळताना दिसून आलं. नाना अगोदरच भित्रा, आणि ते दृश्य त्याची बोबडीच वळली. " कोण असंल बरं? रातच्या पारी हि अंधारात कोण लोंबकळत आसल? असा प्रश्न त्याला पडला. पाणी उपसताना तो डहाळीकडच पाहत बसला, पाणी उपसायचे काम थांबले. तोंडातून " राम " नामाचा जप चालूच होता. तोंडाला सोकन पडली होती. शरीर गर्भगळीत झाले होते. अंगावरचे केस उभे राहीले होते. शरीरातील रक्तात भीतीचेच वातावरण होते. आता काय करावं , पळावं तर झाडाच्या खालनचं वाट हाय. दुसरीकडन पळाव तर मसनवटा, पांडुरंगा वाचीव देवा ! सतत मानत हाच विचार चालू होता. ढाळीवर त्या आकृतीचे झोके घेणे चालूच होते. पंपाजवळच्या टेंभ्याच्या उजेडामुळे ती आकृती अंधुक दिसत होती व पुरुषासारखी दिसत होती. नानाला तर कापरंच भरलं होतं. आता तर ती आकृती गाणीही म्हणू लागली. हळू हळू वाऱ्याच्या झोकांमुळे आवाज स्पष्ट येऊ लागला.

"झोका, माझा उंच आकाशा एवढा रं

मला आकाश एवढे उंच व्हायचं रं !"

आणि त्याचा झोका खरंच फार मोठा झाला. एवढा झोका नानाने केव्हाच पाहिला नव्हता. नानाला आता तर घेरीच येऊ लागली. वारं भरभरू लागलं होते. तसा त्याच्या झोक्यांचा वेग वाढला होता. वाऱ्यामुळे टेंभा विझला होता. आता सगळाच अंधार झाला होता. पण झोका घेणारा तरीही दिसत होता. कोणास ठावूक का ते? नाना आता नविलाज असल्याने गुडघ्यावर बसून त्याचा बिन पैशाचा तमाशा पहात होता. तेवढ्यात मोठी किंकाळी ऐकू आली. नानाचे काळीज धडाडलेला. तो झोका घेणारा जमीनीवर पडला होता. आणि मोठ्याने ओरडू लागला.

सगळा खेळ ओढ्यात चालला होता. मध्यरात्र ओलांडून गेली तरी नाना घरी आला नाही. म्हणून रावबा शोधायला आला होता. हा त्याचा लहान भाऊ पण शूर होता. शिवारात रात्र असू, की दिवस केव्हा ही, कुठे ही, जायला तो घाबरत नसे. रावबाने जवळ जावून त्याच्या पाठीवर हात ठेवला. थंडगार हाताचा स्पर्श जाणवून नाना जोरात ओरडला, जमिनीवर लोटांगण घालून म्हणू लागला.

" आरं मला नकू मारूस, मी काय बी न्हाई बघितलं. मी पाणी न्यायला आलु हुतो.

मी हितनं निघून जातो. पण मला मारू नकोस."

हे दृश्य पाहून रावबाने त्याला उठवले व म्हणाला, " आरं, दादा, मी रावबा हाय. अन ह्ये काय बडबड तुयास?"

रावबाला पाहून त्याला थोडासा धीर आला होता. पण भावाच्या रुपात भूत तर नसंल? असा प्रश्न त्याला पडला होता. पण रावबाच्या गळयातली पांडुरंगाची माळ पाहून त्याला भावावर विश्वास वाटला. तो आता रावबाच्या कुशीतच शिरला आणि रडू लागला. रावबाला तो म्हणू लागला, " ते त्या झाडावर कुणी तरी झोकं घेत होतं. आन फटकन खाली पडल." रावबाने त्याला समजावले.

" आरं नाना तिथं कुणी बी न्हाय तुला भास झाला असल." असे म्हणून त्याला घेऊन तो घरी आला घरात आल्या बरोबर त्याला घामच सुटला. अंगात ताप भरला थंडी वाजु लागली होती. सारखा त्याला तो किंकाळीचा आवाज सतावत होता. घरातली मंडळी त्याला समजावण्याचा प्रयत्न करीत होती. पण त्याला खूळच लागलं होतं. वारंवार तो झोकं घेण्याचा प्रयत्न करत होता.

रात्रभर हे चाललं होतं. दिवस उगवताना रावबाने मांत्रिकाला बोलावलं होतं, मांत्रिकाने त्याला पहिले व तो समजून गेला रावबाला तो म्हणाला, " रावबा रातच्याला ह्याला वड्यातल्या  भूतान झपाटलया.

तवा भूत उतरवला पाह्यजे. त्यासाठी एक कोंबडा, रोट आंब्याचा झाडाखाली अमुशाला ठिवून आलं  पाह्यजे. तवाच त्याच्या अंगावरच भूत उतरलं."

"तुम्ही काय बी काळजी करू नका. मी स्वतः ठिवून च्या ईन.” रावबा म्हणाला.

"आरं बाबा तू जाऊन न्हाय चालायचं नानालाच जायला व्होवं. मी तात्पुरता मंत्रान त्याला ठीक करतु."

मांत्रिकाच्या मंत्राने नाना ठीक झाला होता. पण संध्याकाळ होताच तो घराबाहेर पडायलाही भित होता. इकडं गावातही भीतीचं वातावरण आणखीनच पक्कं झालं होतं. गावात पारावर माणसं जमत. तोंडात पान सुपारी खात खात सगळे नानाला झालेल्या भुतबाधे विषयीचं बोलत असत. गावात, शिवारात भूताटकिचेच विषय रंगत होते. गावात कडूसं पडलं की, घरची दारं बंद होत. लहान पोरं आईच्या कुशीतच बसून असत. थोर मंडळीही भीतीनं घरातच बसत असत. इकडं नानाच्या झोपेत ते झोकं घेणारं माणूस सतत येतच व्हतं. तेव्हा तो रावबाला विचारत असे,

" आरं ह्ये काय हाय रं ? दादा मांत्रिकान तुला काय सांगितलं?" तेव्हा रावबाने त्याला सागितलं.

" आरं नाना गेल्या वर्षी एक मांगाचा पोरगा होता. पण आंबं काढताना तो झाडावरनं पाय घसरून पडला. त्यानं डहाळीला पकडण्याचा प्रयत्न केला. पण डहाळीच तुटली. भर दुपारी बारा वाजता तडफडत त्येचा आत्मा गेला. तवा पासून त्यो नवख्या माणसाला झाडावर लोंबकाळताना दिसतुया कवा कवा!"

" आरं पण ह्ये घडलं कवा?" नानानं विचारलं.

" गेल्या वर्षी तू तायकड गेला व्हता तवा. लई माणसं आली हुती बघायला. पंपाच्या जवळच गाडला त्येला. तवा पसनं लई जणांना झपाटलं हाय त्यानं."

हे सर्व ऐकल्यावर नाना चांगलाच चरकला मनात म्हणाला , "  आयला, ह्ये काय बघितलं. मी भुताच दर्शन त्ये बी म्होरं. आजपर्यंत नुसतं आयकलं ह्योत. त्ये राती बघितलं. आता भितीनं पुन्हा त्याचं शरीर हलू लागल. ताप चढला. मांत्रिकाला पुन्हा बोलवण्यात आलं. त्याने सांगितलं, " आज अमुशा हाय तवा नाना कोंबड आन रोट आंब्याच्या झाडाखाली निऊन ठेवला पाह्यजे. तवा सारं शांत हुइल. आन ते भुत कवाच त्याला तरास देणार न्हाय."

संध्याकाळ झाली होती. आज पावसाचं वातावरण दिसत होतं. आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केली होती. वारं जोरानं वहात होतं. लोकांना आज रात्रीचा पाऊस पडंल असं वाटत होतं. नानाला घरातल्यांनी व गावातल्या लोकांनी कसा बसा तयार केला. तसा तो तयार नव्हताच पण गावाचं ऐकावं लागलं. तो तयार झाला. रात्रीच्या बाराला तो घरातनं बाहेर पडला. काळा किट्ट अंधार होता. मधून मधून विजा चकाकत होत्या. थोडं थोडं पावसाचे थेंब ठिपकत होते. त्या मुळे मातीला सुगंध पसरला होता. पण नानांचा जीव भितीन कासावीस झाला होता. त्याला त्या सुगंधाचे काय?

कसायाकड नेल्या जाणाऱ्या बकरयाची  जी अवस्था होते तीच अवस्था नानाची झाली होती. नाना आंब्याच्या झाडाखाली " राम " नामाचा जप करीत पोहोचला. आणलेलं समान झाडाखाली ठेवलं. अंधारात त्याला कोणीही दिसलं नाही. कावार सुटलं होतं. नाना शर्यतीला धावणाऱ्या बैलासारखा घराकड पळतच सुटला.

रात्रभर पाऊस पडला होता. ओढ्याला पाणीच पाणी आलं होतं. विहीरी, नदी सगळं तुडुंब भरलं होतं. नाना पूर्वी सारखाच चांगला झाला होता. भूत-बीत तसलं काही राहयल नव्हतं.

एवढ्यात दादा मांत्रिकाला त्यानं पाहिलं. त्याला बोलावून विचारलं, "काय रं दादा , कुणीकड चालला हाईस?" " सावल्या म्हाराकड " दादा उत्तरला.

" त्ये कशा पाई?" नानान पुन्हा विचारले.

दादा म्हणाला, " आरं तुझ्या त्या झोकंवाल्या भूतानं झपाटलंय त्याला, तवा त्याला बघायला चाललुया. चाल तू बी माझ्या संग."

नाना तयार नसताना त्याला जबरदस्तीन नेलं. सावळयाच्या घरात धिंगाणा चालला होता. सावळयाची पोरं -बायको घराबाहेर उभं राहून आत बघत होती. नानानं आत बघितलं. सावळया झोकं घेत होता. घरात अंधार होता, " तो म्हणत होता उंच माझा झोकं रं.... नाना आणखीनच घाबरला."

“हे त्येच हाय !” तो दादाला म्हणाला.

दादानं आत जाऊन सावळयाला खाली उतरवलं. त्याच्यावर मंत्र टाकून त्याला माणसात आणलं. रात्रीचा सावळया ठरल्या नुसार कोंबडा - रोट घेऊन गेला होता. आंब्याखाली सामान ठेऊन सावळया माघारी फिरला. तेव्हा मागनं आवाज आला. " आरं तुझ्या बरोबर झोकं घ्यायला मजा न्हाय येत. तवा नानाला म्हणावं तयार राहा, माझ्याबरोबर झोकं खेळायला !"

हे ऐकून दुसऱ्या दिवशी नानाची काय अवस्था झाली हे मला सांगता यायचे नाही.

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात चांगला वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि “वेळ” हा “घालवण्या”साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातून शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. मनावर होणारे परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भेट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं

विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहीतरी साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. विनामूल्य. हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. ज्या दहा लोकांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान